MHBU130022082024

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.११३/२०२४
प्रशांत – वि – डोरिस

## आदेश निशाणी क्र.२०

प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदार क्र.३ ते ६ यांना लेखी जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून लेखी जबाब दाखल करण्यास परवानगी मिळणे बाबत केला आहे.

०२. अर्जदार सांगतात की, त्यांना प्रकरणात लेखी जबाब दाखल करण्यासाठी आवश्यक असणारी माहिती घेण्याकरिता विलंब लागला त्यामुळे ते त्यांचा लेखी जबाब वेळेत दाखल करु शकले नाहीत. अर्जदार अशी विनंती करतात की, अर्जदार जबाब दाखल करीत आहे. तरी झालेला विलंब माफ होवून जबाब दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी.

०३. सदर अर्जास मुळ अर्जदारातर्फे म्हणणे दाखल करण्यात आले. त्यांनी असे नमूद केले आहे की, गैरअर्जदार यांना दि.१२/१२/२०२४ रोजी समन्स प्राप्त झालेले आहे. प्रकरणात हजर होऊन त्यांना १ वर्ष उलटून गेले असून देखील आजपर्यंत त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे अभिलेखावर दाखल केले नाही. त्यामुळे गैरअर्जदार यांचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी मागणी अर्जदार यांनी केली आहे.

०४. अर्जदार व गैरअर्जदार यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. प्रस्तुतचा अर्ज मुळ अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ९, नियम ९ नुसार दावा पुर्नस्थापीत होऊन मिळणेकरिता दाखल केलेला आहे. गैरअर्जदार हे मुदतीमध्ये लेखी जबाब दाखल करु शकले नाही. प्रस्तुतचा अर्ज हा गुणदोषांवर ठरिविण्यासाठी गैरअर्जदार यांचा लेखी जबाब अभिलेखावर येणे

आवश्यक आहे. त्यामुळे गैरअर्जदार यांना त्यांचा लेखी दाखल करण्यास संधी देणे उचीत ठरेल. गैरअर्जदार यांना लेखी जबाब दाखल करण्यासाठी झालेला विलंब खर्चावर माफ करता येण्यासारखा आहे. तसे करण्याने गैरअर्जदार यांचा लेखी जबाब अभिलेखावर येईल व प्रकरणातील गुंतागुंत टळेल तसेच प्रकरण गुणदोषावर अंतीमतः निकाली काढणे शक्य होईल.

०६. सबब, वरील चर्चेचा, मुळ अर्जाचा व अर्जाचे स्वरुपाचा विचार करता अंतिम न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादींचा अर्ज निशाणी क्र.२० हा गैरअर्जदार क्र. ३ ते ६ यांनी प्रत्येकी रक्कम रु.३००/- (रुपये तीनशे मात्र) देण्याच्या खर्चावर मंजूर करुन लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे. खर्चाची रक्कम मुळ अर्जदार यांना देण्यात यावी.

MEGHA VENKATRAO POUL

Digitally signed by MEGHA VENKATRAO POUL
Date: 2026.04.15 17:41:27 +0530

(श्रीमती एम.व्ही.पौळ )

दिनांक : १५.०४.२०२६

२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर
चिखली.